CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 4 Jul 24, 2024

# सिडकोच्या २४३ दुकानांची संगणकीय सोडत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई** : सिडकोच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्रीसाठी मंगळवारी संगणकीय सोडत काढण्यात आली. तत्पूर्वी सोमवारी ई-लिलाव प्रक्रिया राबविण्यात आली होती. दरम्यान, या योजनेला व्यावसायिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी यशस्वी ठरलेल्या सर्व व्यावसायिकांचे अभिनंदन केले आहे. सिडकोने १४ मार्च २०२४ रोजी बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांची विक्री जाहीर केली होती.

## व्यवसाय वृद्धी करण्याची संधी

सिडकोच्या गृहनिर्माण योजनांची विश्वासार्हता आणि उलवे नोडसारख्या परिसरामध्ये मिळालेली व्यवसाय वृद्धीची संधी यामुळे या योजनेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. लहान, मध्यम व मोठ्या आकाराची दुकाने उपलब्ध असल्याने मोठ्याप्रमाणेच लघू व मध्यम व्यावसायिकांसाठीसुद्धा लाभदायीचे विजय सिंघल यांनी स्पष्ट केले आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
महामुंबई
बुधवार,
२४ जुलै २०२४

# बामणडोंगरीतील दुकाने प्रतिचौरस मीटरला तीनपट चढ्या दराने भाव

## मंगळवारी सिडको भवनात २४३ दुकानांच्या विक्रीची सोडत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पनवेल :** सिडको महामंडळाने बामणडोंगरी येथे बांधलेल्या गृहनिर्माणामधील २४३ दुकानांची विक्री इ -लिलाव पद्धतीने सोडत काढण्यात आली होती. मंगळवारी या सोडतीचा निकाल जाहीर झाल्यानंतर सिडकोच्या अपेक्षित असणा-या तीन पट दराने म्हणजेच सुमारे एका मीटरला साडेसहा लाख रुपयांचा दर मिळाल्याने गुंतवणूकदारांनी पुन्हा एकदा सिडकोच्या नियोजनावर विश्वास टाकल्याचे चित्र आहे.

१४ मार्चला सिडकोने या योजनेतील दूकानांच्या विक्रीची योजना जाहीर केली होती. बामनडोंगरी हा उलवे नोडचा परिसर असल्याने या परिसरालगत आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. काही मिनिटांवर अटल सेतू (एमटीएचएल) तसेच नेरुळ उरण रेल्वेमार्गापासून हाकेच्या अंतरावर ही दूकाने विक्रीसाठी उपलब्ध असल्याने दूकान विक्रीकडे अनेक महिन्यांपासून व्यावसायिकांचे लक्ष लागले होते. यामध्ये सर्वात लहान दूकान १ चौरस मीटरचे तर सर्वात मोठे दूकान ३९ मीटरचे होते. १८ चौरस मीटरच्या दुकानांची अपेक्षित किंमत ३९ लाखांपेक्षा अधिक तर ३९ चौरस मीटरच्या दुकानाची आधारभूत किंमत ८२ लाखांपेक्षा अधिक होती. सुरू झाल्याने बामणडोंगरीचे महत्व वाढले आहे. भविष्यात या दुकानांची किंमत वाढेल या उद्देशाने या सोडतीमध्ये अनेकांनी आपले नशीब आजमावले.

> सर्वसामान्य नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याबरोबरच विकासक, उद्योजक, व्यावसायिक अशा विविध घटकांच्या हिताकरिता सिडकोतर्फे नेहमीच विविध योजना राबविण्यात येतात. सदर २४३ दुकानांच्या विक्री योजनेद्वारे अनेक व्यावसायिकांना वेगाने विकसित होणाऱ्या व उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे नोडमध्ये आपल्या व्यवसायाची वृद्धी करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. या योजनेला मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे सिडकोबद्दल नागरिकांच्या मनात असलेल्या विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब झाले आहे.
>
> - विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको



CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, बुधवार, २४ जुलै २०२४ **महामुंबई पुढारी**

# बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांना मिळाला तिप्पट दर

## सिडकोच्या विक्री योजनेस व्यावसायिकांचा उत्तम प्रतिसाद

**नवी मुंबई: पुढारी वृत्तसेवा**

सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्री योजनेची आज मंगळवारी संगणकीय सोडत काढण्यात आली. यावेळी सिडकोने निश्चित केलेल्या दरापेक्षा तीनपट दर या योजनेतील दुकानाच्या गाळ्यांना मिळाला. यावेळी मोठ्या संख्येने व्यावसायिकांचा प्रतिसाद मिळाला.

सिडकोने १४ मार्च रोजी सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्रीची योजना जाहीर केली होती. या योजनेची सोडत आज मंगळवारी सिडको भवन येथे काढण्यात आली. अनेक व्यावसायिक यामध्ये सहभागी झाले होते. सिडकोने जाहीर केलेल्या प्रती चौरस मीटर दरापेक्षा तीनपट दर या योजनेतील दुकानाच्या गाळ्यांना मिळाला. या योजनेद्वारे रस्ते, रेल्वे, अटल सेतू (एमटीएचएल) यांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे



नोडमधील बामणडोंगरी गृहसंकुलातील ही दुकाने विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. सिडकोचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उलवे नोडच्या नजीकच्या परिसरात आकारास येत आहेत. सिडकोच्या गृहनिर्माण योजनांची विश्वासार्हता आणि उलवे नोडसारख्या परिसरामध्ये मिळालेली व्यवसाय वृद्धीची संधी यामुळे या योजनेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

लहान, मध्यम व मोठ्या आकाराची दुकाने उपलब्ध असल्याने मोठ्या व्यावसायिकांप्रमाणेच लघु व मध्यम व्यावसायिकांकरिताही ही योजना लाभदायी ठरली आहे.

> “ सर्वसामान्य नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याबरोबरच विकासक, उद्योजक, व्यावसायिक अशा विविध घटकांच्या हिताकरिता सिडकोतर्फे नेहमीच विविध योजना राबविण्यात येतात. सदर २४३ दुकानांच्या विक्री योजनेद्वारे अनेक व्यावसायिकांना वेगाने विकसित होणाऱ्या व उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे नोडमध्ये आपल्या व्यवसायाची वृद्धी करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. या योजनेला मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे सिडकोबद्दल नागरिकांच्या मनात असलेल्या विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब झाले आहे.
>
> **-विजय सिंघल,** व्यवस्थापकीय संचालक, सिडको

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

नवराष्ट्र | मुंबई, २४ जुलै २०२४

# २४३ दुकानांच्या विक्री योजनेस प्रतिसाद

**नवी मुंबई,** (वा.) सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्री योजनेस व्यावसायिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला असून दिनांक २३ जुलै २०२४ रोजी सिडको भवन येथे या योजनेची संगणकीय सोडत काढण्यात येऊन योजनेचा निकाल जाहीर करण्यात आला.

सिडकोतर्फे १४ मार्च २०२४ रोजी सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्रीची योजना जाहीर करण्यात आली होती. या योजनेद्वारे रस्ते, रेल्वे, अटल सेतू (एमटीएचएल) यांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे नोडमधील बामणडोंगरी गृहसंकुलातील ही दुकाने विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. सिडकोचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उलवे नोडच्या




नजीकच्या परिसरामध्ये आकारास येत आहे.

सिडकोच्या गृहनिर्माण योजनांची विश्वासार्हता आणि उलवे नोडसारख्या परिसरामध्ये मिळालेली व्यवसाय वृद्धीची संधी यांमुळे या योजनेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

> "सर्वसामान्य नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याबरोबरच विकासक, उद्योजक, व्यावसायिक अशा विविध घटकांच्या हिताकरिता सिडकोतर्फे नेहमीच विविध योजना राबविण्यात येतात. सदर २४३ दुकानांच्या विक्री योजनेद्वारे अनेक व्यावसायिकांना वेगाने विकसित होणाऱ्या व उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे नोडमध्ये आपल्या व्यवसायाची वृद्धी करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. या योजनेला मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे सिडकोबद्दल नागरिकांच्या मनात असलेल्या विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब झाले आहे."
>
> -विजय सिंघल
> उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

लहान, मध्यम व मोठ्या आकाराची दुकाने उपलब्ध असल्याने मोठ्या व्यावसायिकांप्रमाणेच लघु व मध्यम व्यावसायिकांकरिताही ही योजना लाभदायी ठरली आहे.

नवराष्ट्र | मुंबई, २४ जुलै २०२४

# २४३ दुकानांच्या विक्री योजनेस प्रतिसाद

नवी मुंबई, (वा.) सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्री योजनेस व्यावसायिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला असून दिनांक २३ जुलै २०२४ रोजी सिडको भवन येथे या योजनेची संगणकीय सोडत काढण्यात येऊन योजनेचा निकाल जाहीर करण्यात आला.

सिडकोतर्फे १४ मार्च २०२४ रोजी सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्रीची योजना जाहीर करण्यात आली होती. या योजनेद्वारे रस्ते, रेल्वे, अटल सेतू (एमटीएचएल) यांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे नोडमधील बामणडोंगरी गृहसंकुलातील ही दुकाने विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. सिडकोचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उलवे नोडच्या नजीकच्या परिसरामध्ये आकारास येत आहे.




सिडकोच्या गृहनिर्माण योजनांची विश्वासार्हता आणि उलवे नोडसारख्या परिसरामध्ये मिळालेली व्यवसाय वृद्धीची संधी यांमुळे या योजनेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

> "सर्वसामान्य नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याबरोबरच विकासक, उद्योजक, व्यावसायिक अशा विविध घटकांच्या हिताकरिता सिडकोतर्फे नेहमीच विविध योजना राबविण्यात येतात. सदर २४३ दुकानांच्या विक्री योजनेद्वारे अनेक व्यावसायिकांना वेगाने विकसित होणाऱ्या व उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे नोडमध्ये आपल्या व्यवसायाची वृद्धी करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. या योजनेला मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे सिडकोबद्दल नागरिकांच्या मनात असलेल्या विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब झाले आहे."
>
> –विजय सिंघल
> उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

लहान, मध्यम व मोठ्या आकाराची दुकाने उपलब्ध असल्याने मोठ्या व्यावसायिकांप्रमाणेच लघु व मध्यम व्यावसायिकांकरिताही ही योजना लाभदायी ठरली आहे.



लोकमत मुंबई, बुधवार, दि. २४ जुलै २०२४

पायाभूत सुविधांच्या कामांवर ६४११ कोटी करणार खर्च

# नैना क्षेत्रात सिडको विणणार रस्त्यांचे जाळे

कमलाकर कांबळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित क्षेत्राच्या (नैना) विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने सिडकोने कंबर कसली आहे. त्यानुसार पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर दिला जात आहे. काही महिन्यांपूर्वी ३,११४ कोटी रुपयांच्या कामाच्या निविदा मागविल्या होत्या. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे रखडलेली ही प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे. यातच आता रस्ते आणि इतर पायाभूत सुविधांच्या कामासाठी सुमारे ३३०० कोटींच्या खर्चाची निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. एकूणच पुढील काही महिन्यांत नैना क्षेत्रात जवळपास ६४११ कोटींच्या पायाभूत सुविधांच्या कामांना सुरुवात होणार आहे.

नैना क्षेत्राला झालेली दिरंगाई लक्षात घेऊन व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी या प्रकल्पाला चालना देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यादृष्टीने या क्षेत्रात रस्त्यांसह इतर आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. नैनाचा पायलट प्रकल्प आणि २३ गावांचा समावेश असलेल्या पहिल्या टप्प्यातील विकासकामांना प्राधान्य दिले आहे.




१ पहिल्या टप्प्यात १२ नगररचना परियोजना (टीपीएस) प्रस्तावित आहेत. त्यापैकी नगररचना परियोजना क्रमांक २.३.३.४.५.६ आणि ७ अंतर्गत प्रस्तावित असणाऱ्या रस्ते, पदपथ, पावसाळी पाण्याची गटारे आदी विकासकामांसाठी ३११४ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकीय किमती एवढ्या निविदा मागविण्यात आल्या होत्या.

२ त्यांचे आर्थिक देकार नुकतेच उघडण्यात आले असून, लवकरच या विकासकामांना सुरुवात होईल, असा विश्वास संबंधित विभागाने व्यक्त केला आहे. त्यापाठोपाठ आता नगररचना परियोजना क्रमांक ८, ९, १०, ११ आणि १२ मध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ३३०० कोटींच्या खर्चाचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

## ७ हजार ५०० कोटींचा भार

नैना क्षेत्राच्या विकासावर टप्प्याटप्प्याने ७ हजार ५०० कोटी रुपये खर्च करण्याचे सिडकोचे नियोजन आहे. गेल्या वर्षी या विभागातील अंतर्गत रस्ते, मलवाहिन्या आणि पदपथांच्या कामासाठी सिडकोने १२०० कोटी रुपये खर्च केले आहेत, तर या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच ३,११४ कोटींची कामे प्रस्तावित केली आहेत तर आता ३३०० कोटी रुपयांच्या कामांचे प्रस्ताव मागविले आहेत.

## भूधारकांना सिडकोचे आवाहन

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे नैना क्षेत्राला विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे. तेथील जागांच्या किमती वाढणार आहेत. त्यामुळे आर्थिक आणि सामाजिक प्रगती होणार आहे. ही बाब लक्षात घेऊन या क्षेत्रात पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्याची सिडकोची योजना आहे. सुविधा उपलब्ध झाल्यास विकासाला गती मिळेल. त्याच भूमिकेतून सिडकोने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भूधारकांसह विकासक आणि गुंतवणूकदारांनी सहकार्याची भूमिका ठेवावी, असे आवाहन सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केले आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in